**संपादकीय**

“नवज्योत” परिवारास मराठी नववर्षाच्या शुभेच्छा ‘नवज्योत’ आंतरराष्ट्रीय आंतरविद्याशाखीय संशोधन पत्रिकेद्वारे संशोधक प्राध्यापक व विद्यार्थ्यांना हक्काचे व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचे काम ‘नवज्योत’ च्या संपादक मंडळाने सातत्याने केले आहे.वेगवेगळ्या विषयातील संशोधन वाचकांना उपलब्ध करून दिले आहे. शिवाजी विद्यापीठ राज्यशास्त्र व लोकप्रशासन परिषदेच्या २७ व्या अधिवेशनाच्या निमित्याने वाचल्या गेलेल्या संशोधनापर लेखांना या अंकात प्रस्तुत करण्यास संपादक मंडळाने पुढाकार घेतला आहे. भारतीय राजकारणाची ७५ वर्षे वाटचाल व स्थित्यंतरे या मुख्य विषया बरोबरच आंतरराष्ट्रीय राजकारण, छत्रपती शाहू महाराज जिवन व कार्य यावर आधारित लेख त्याच बरोबर, विविध सामाजिक शास्त्राचे व कॉमर्स विद्याशाखेतील संशोधन पेपरना व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचे काम केले आहे.

‘नवज्योत’ परिवारात नव्याने सहभागी झालेल्या सदस्याचे स्वागत आपल्या विश्वासावर व सहकार्यावर ‘नवज्योत’ दिवसेनदिवस विकसीत होत जाईल या आशेवर प्रस्तुत अंक वाचकांना समर्पित.

धन्यवाद!

आपला

डॉ. रविंद्र सरोदे